
छकुल्या
...मुकलेल्या!
०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण
(१९९१–२००१–२०११) महाराष्ट्र
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.

## सध्याच्या आधुनिक जगात, समान हक्कांच्या युगात, मुलांचा हव्यास इतका पराकोटीला जातो की, मुलीचा जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला जातो. या वेड्या हव्यासाच्या विपरित परिणतीचे हे चित्रांकन !

''अनिष्ट रूढी (मुलांचा हव्यास) व आधुनिक तंत्रज्ञान (सोनोग्राफी) यांमधील घातक हातमिळवणीने (Unholy alliance) भारतीय समाजात गहजब माजवला आहे.''

**– डॉ. आशिष बोस**

---

''०–६ वर्षे वयाचे बालक बालिकांचे बिघडलेले संतुलन नीट करणे कठीण आहे आणि त्याचे दुष्परिणाम आपल्याला खूप काळापर्यंत भोवणार आहेत.''

**– जे. के. बाँठिया**

भारताचे महानिबंधक व जनगणना आयुक्त २००१

---

''भारतात दरवर्षी सुमारे ५ लाख मुली जन्माला येण्यापूर्वीच जीवनाला मुकतात.''

**– प्रभात झा, राजेशकुमार इ.**

द लॅन्सेट, ९ जानेवारी २००६

---

''स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीपासून बालक–बालिका प्रमाण २०११च्या जनगणनेमध्ये सर्वात कमी झाले आहे''

**– डॉ. सी. चंद्रमौळी**

भारताचे महानिबंधक व जनगणना आयुक्त २०११

---



# छकुल्या ...मुकलेल्या!

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण
(१९९१-२००१-२०११)

# महाराष्ट्र राज्यातील तालुकानिहाय स्थित्यंतर

संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष यांच्या सहाय्याने प्रसिध्द.

तृतीय आवृत्ति

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | | पान क्र. |
|---|---|---|
| १ | १ सप्टेंबर, २०११ रोजी मा. पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रातील सारांश................. | ०३ |
| २ | अपर मुख्य सचिव- शुभसंदेश .................................... | ०४ |
| ३ | प्रास्ताविक .......................................................... | ०५ |
| ४ | मनोगत .............................................................. | ०६ |
| ५ | ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण - भारत ....... | १० |
| ६ | महाराष्ट्र जिल्हा ..................................................... | ११ |
| ७ | महाराष्ट्र तालुके ..................................................... | १२ |
| ८ | मुंबई उपनगरे व मुंबई जिल्हा .................................... | १३ |
| ९ | रायगड जिल्हा ....................................................... | १४ |
| १० | रत्नागिरी जिल्हा .................................................. | १५ |
| ११ | ठाणे जिल्हा .......................................................... | १६ |
| १२ | अहमदनगर जिल्हा ................................................ | १७ |
| १३ | धुळे जिल्हा .......................................................... | १८ |
| १४ | जळगाव जिल्हा ..................................................... | १९ |
| १५ | नाशिक जिल्हा ...................................................... | २० |
| १६ | नंदूरबार जिल्हा ..................................................... | २१ |
| १७ | पुणे जिल्हा .......................................................... | २२ |
| १८ | सोलापूर जिल्हा ..................................................... | २३ |
| १९ | सातारा जिल्हा ...................................................... | २४ |
| २० | कोल्हापूर जिल्हा .................................................. | २५ |
| २१ | सांगली जिल्हा ...................................................... | २६ |

| अ. क्र. | | पान क्र. |
|---|---|---|
| २२ | सिंधुदुर्ग जिल्हा ..................................................... | २७ |
| २३ | औरंगाबाद जिल्हा ................................................. | २८ |
| २४ | जालना जिल्हा ...................................................... | २९ |
| २५ | परभणी जिल्हा ...................................................... | ३० |
| २६ | हिंगोली जिल्हा ..................................................... | ३१ |
| २७ | बीड जिल्हा .......................................................... | ३२ |
| २८ | नांदेड जिल्हा ....................................................... | ३३ |
| २९ | लातूर जिल्हा ........................................................ | ३४ |
| ३० | उस्मानाबाद जिल्हा ............................................... | ३५ |
| ३१ | अकोला जिल्हा ..................................................... | ३६ |
| ३२ | अमरावती जिल्हा .................................................. | ३७ |
| ३३ | बुलढाणा जिल्हा .................................................... | ३८ |
| ३४ | यवतमाळ जिल्हा ................................................... | ३९ |
| ३५ | वाशिम जिल्हा ...................................................... | ४० |
| ३६ | भंडारा जिल्हा ...................................................... | ४१ |
| ३७ | चंद्रपूर जिल्हा ...................................................... | ४२ |
| ३८ | गडचिरोली जिल्हा ................................................ | ४३ |
| ३९ | नागपूर जिल्हा ...................................................... | ४४ |
| ४० | वर्धा जिल्हा ......................................................... | ४५ |
| ४१ | गोंदिया जिल्हा ..................................................... | ४६ |
| ४२ | महाराष्ट्र राज्यातील तालुकानिहाय फरक ............................ | ४७ |
| ४३ | वेगवेगळ्या राज्यांतील बालिका-बालकांचे प्रमाण .................. | ४८ |

## १ सप्टेंबर, २०११ रोजी मा. पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्राचा सारांश.

समाजात कमी होणारे स्त्रीयांचे प्रमाण ही एक गंभीर समस्या आहे. अजूनही बऱ्याच ठिकाणी गर्भ लिंग निदान चाचणी केली जाते, हे एक मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. याचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. पंतप्रधान श्री. मनमोहन सिंह यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी गर्भ लिंग निदानावर प्रतिबंध घालण्याविषयी शीघ्र व संघटित उपाय करण्याबद्दल सूचित केले.

महिलांच्या प्रती असणारा भेदभाव नाहीसा करण्याच्या धोरणाचा आणि कार्यक्रमाचा भाग म्हणून राजकीय प्रतिनिधीसह सामाजिक संस्था, धार्मिक व सांप्रदायिक नेते यांच्या सहभागाने वैयक्तिकरित्या पुढाकार घेऊन या समस्येवर जनजागृती करण्यावर भर देण्याविषयी मनमोहन सिंह यांनी मुख्यमंत्र्यांना सूचित केले.

बालिका-बालक प्रमाण म्हणजे ०-६ वर्षे वयाच्या बालिकांचे त्याच वयोगटातील १००० बालकांमागे संख्या. जनगणनेनुसार २००१ मधील ९२६ पासून २०११ मध्ये ९१९ पर्यंत घटल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले.

"ही एक अतिशय गंभीर बाब असून ह्या महत्त्वाच्या विषयावर मी अत्यंत व्यथित होऊन तुम्हास लिहीत आहे." अशा शब्दांत लिहून त्यांनी मुख्यमंत्र्यांकडून प्रतिक्रियेची अपेक्षा व्यक्त केली.

प्रत्येक राज्याच्या आकडेवारीवर प्रकाश झोत टाकताना मनमोहन सिंह म्हणाले, "देशाच्या सरासरी बालिका-बालक प्रमाणपेक्षा राज्यांची विलगित आकडेवारी जास्तच भयानक चित्र दर्शविते."

"महिलांच्या प्रती असलेला भेदभाव व सामाजिक पूर्वग्रह सर्व स्तरांवर बदलण्याची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञान वापरुन प्रसतिपूर्व लिंग निवड, जन्मलेल्या मुलींकडे दुर्लक्ष याविरुध्द आपण कडक कारवाई करण्याची गरज आहे," असे त्यांनी निक्षून सांगितले.

"प्रसवपूर्व लिंग निदान कायद्याच्या अंमलबजावणीचे आव्हान बहुतांशी भागात अजून कायम आहे" असे नमूद करुन ते म्हणाले, "राज्यांनी व केंद्र शासित प्रदेशांनी कायद्याची कठोर व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी परीक्षण व तपासणी यंत्रणा मजबूत करण्याची गरज आहे."

"गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान कायद्याच्या अंमलबजावणीच्या बळकटीकरणासाठी संघटीत योजना राबवावी, अशी मी आपणास कळकळीची विनंती करतो. महिलांविषयी समाजात असणारे प्रचलित पूर्वग्रह नष्ट करण्यासाठी धार्मिक व सांप्रदायिक नेते, लोकप्रतिनिधी इत्यादी समाजातील सर्व घटकांचा समावेश करावा," असे पंतप्रधान मुख्यमंत्र्यांना म्हणाले.

"आपण याबाबत वैयक्तिक पुढाकार घेऊन कायदा मोडणाऱ्यास शीघ्र आणि कठोर शिक्षा मिळेल याची खात्री करावी, अशी देखील विनंती मी आपणास करतो."

"गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान कायद्याच्या कडक अंमलबजावणी बरोबरच समाजाने मुलींच्या जन्माला, संगोपनाला व उत्कर्षाला प्रोत्साहन द्यावे यासाठी सलग कार्यवाही करणे गरजेचे आहे." असे पंतप्रधान म्हणाले.

स्त्री गर्भ, बालिका, किशोरी, महिला यांच्या प्रती होणारे भेदभाव नष्ट करण्यासाठी अनेक आघाड्यांवर धोरण व कृतीशील कार्यक्रम ठरविणे गरजेचे आहे ह्यावर देखील त्यांनी भर दिला.

"या समस्या दूर करण्यासाठी अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत. महिला व बाल कल्याणासाठी केंद्र पुरस्कृत अनेक योजना आहेत. आपल्या राज्यातही अशा अनेक योजना राबविल्या जात असतील याची मला खात्री आहे.

"वरील सर्व बाबींचा सर्वांगीण विचार होणे, कार्यक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे, सध्याच्या अडचणी, कार्यक्रम तथा धोरण, तसेच कायदेविषयक त्रुटी शोधून भरुन काढणे ही सध्याची निकड आहे." असे माननीय श्री. मनमोहन सिंह म्हणाले.




सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

अपर मुख्य सचिव
सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई


# शुभसंदेश

सहा वर्षे पर्यंतच्या वयोगटातील बालीका -बालकांचे कमी होत असलेले प्रमाण समाजात स्त्रियांना मिळणारी दुय्यम दर्जाची वागणूक आणि स्त्री / पुरुष भेदभाव हयांचे एक महत्वपूर्ण ध्योतक आहे. महाराष्ट्रासारख्या सर्वच क्षेत्रात प्रगतीपथावर असणाऱ्या राज्यात १००० बालकांमागे ८९४ बालीकेंचे प्रमाण आपणा सर्वांकरीता एक अतिशय चिंतनीय बाब आहे.

२०११ च्या जनगणनेच्या आकडेवारींचा अभ्यास करुन तयार केलेली ही पुस्तिका केवळ जिल्हयांची नाही तर प्रत्येक तालुक्याची बालिका- बालक प्रमाणाची स्थिती दर्शवते हया स्थितीत सुधारणा करण्यासाठी एक सर्वांगिण रणनिती निश्चित करण्याची व त्याची परिणामकारक अमंलबजावणी करण्याची आवश्यकता आहे आणि त्याकरीता ही पुस्तिका अतिशय महत्वाची ठरणार आहे. केवळ कायदयांची अमंलबजावणी करुन हा सामाजिक विषमतेचा प्रश्न सुटणारा नाही, तर, सोबतच लैंगिक समानता निर्माण करण्यासाठी सर्वांनीच पुढाकार घेऊन सातत्याने कार्य करणे आवश्यक आहे.

ही पुस्तिका तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रीय लोकसंख्या कोष (युएनएफपीए)च्या सहभागाबद्दल तसेच कायदयांची अमंलबजावणी आणि लैंगिक विषमता दूर करण्याच्या सर्वच प्रशिक्षण/ उद्बोधन कार्यात सतत प्राप्त होणाऱ्या सहकार्याबद्दल मी युएनएफपीएचा आभारी आहे. ही पुस्तिका तयार करण्यासाठी ज्या सर्व अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो. प्रशिक्षण तथा उद्बोधनाच्या कार्यात आणि कार्यक्रमांचे नियोजन करतांना हया पुस्तिकेचा सर्वांना उपयोग होईल हयाची मला खात्री आहे.

शुभेच्छांसह !

थॉमस बेंजामिन



# प्रास्ताविक

स्त्री पुरुषांच्या समानतेचा पुरस्कार सध्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात होताना दिसतो. परंतू प्रत्यक्षात वस्तुस्थिती मात्र फारच वेगळी दिसते. जनगणना २०११ चे आकडेवारी पाहता याबाबतची विदारक स्थिती प्रत्ययात येते. वय वर्षे ६ पर्यंतच्या वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाण हे सामाजिक स्थिती बाबतचे संवेदनशील असे निर्देशांक आहे. आपल्या राज्यात, १९९१ मध्ये लिंगगुणोत्तर प्रमाण ९४६ वरुन २०११ मध्ये ८९४ पर्यंत कमी झाले, म्हणजे दोन दशकात ५२ अंकानी घट झाली आहे.

जिल्हानिहाय लिंगगुणोत्तराची आकडेवारी पाहता बीड जिल्हयामध्ये हे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ९३ अंकानी घसरले आहे. जिल्हयाअंतर्गत तालुक्यांमध्ये सुध्दा लिंगगुणोत्तर प्रमाणामध्ये मोठी तफावत असल्याचे आढळून येते. सर्वसाधारणतः मुलांच्या हव्यासाची मानसिकता तसेच वैद्यकशास्त्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर इत्यादी बाबीं नैसर्गिक लिंगगुणोत्तरामधील असमतोल होण्यास कारणीभूत ठरत आहेत. प्रसूतीपूर्व गर्भलिंगनिदान करुन मुलींचा जन्म होऊ न देण्याच्या प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा लागू करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्यात या कायद्याची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी तसेच समाजामधील मुलाच्या जन्मास प्राधान्य, मुलीच्या लग्नासाठी हुंडा, स्त्रियांना देण्यात येणारा दुय्यम दर्जा अशा अनेक अपप्रवृत्ती असलेली सामाजिक मानसिकता दूर करण्यासाठी कठोर व प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत.

हया सर्व प्रयत्नास हातभार म्हणून मागील तीन जनगणनेतील ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलां-मुलींचे तालुकानिहाय प्रमाण दर्शविणारी पुस्तिका ''छकुल्या मुकलेल्या'' मध्ये प्रसिध्द करण्यास अत्यंत आनंद होत आहे. जागतिक जनसंख्या कोष (युएनएफपीए) यांच्या सहयोगाने या पुस्तिकेची निर्मिती करण्यात आलेली आहे. या पुस्तिकेमधील माहीती संकलन करण्याची महत्वाची कामगीरी डॉ. प्रकाश डोके, प्राध्यापक, महात्मा गांधी मिशन वैद्यकिय महाविद्यालय, पनवेल यांनी पार पाडली. पुस्तिका तयार करण्यासाठी श्रीमती अनुजा गुलाटी, राज्य कार्यक्रम अधिकारी, युएनएफपीए यांचे सहकार्य लाभले. तसेच पुस्तिका तयार करण्यास डॉ.सतीश पवार, संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्गदर्शन लाभले हया सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

मला आशा आहे की, ''छकुल्या मुकलेल्या'' या पुस्तिके मधील माहिती सर्वांना उपयुक्त ठरेल व पर्यायाने मुलींच्या जन्माचे स्वागत होऊन मुलां - मुलींचे प्रमाणात वाढ होण्यास मदत होईल.

(डॉ. उध्दव गावंडे)
कार्यकारी संचालक
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.

# मनोगत

**'छकुल्या... मुकलेल्या'** पुस्तिकेच्या प्रथम आवृत्ती मध्ये महाराष्ट्रातील तालुका निहाय ०-६ वर्षे वयाचे बालिका- बालक प्रमाण प्रसिध्द करुन या गंभीर तथा संवेदनशील विषयासंबंधी जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. जनगणना २०११ नंतर प्रसिध्द झालेल्या आकडेवारीचा अभ्यास केल्यानंतर, या दोन दशकात घडलेले कटू स्थित्यंतर पुन्हा चर्चेत येणे अत्यंत गरजेचे आहे असे वाटते. हे प्रमाण कमी होत आहे याची जाणीव जनगणनेपूर्वीच झाली होती. तथापि या समस्येची दाहकता एवढी तीव्र असेल असे वाटले नव्हते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर २००३ साली प्रसवपूर्व निदान तंत्र कायद्यामध्ये काही बदल झाले. त्याच्या नंतरच खऱ्या अर्थाने कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. कायद्याच्या अंमलबजावणीत महत्वपूर्ण भूमिका साकारणाऱ्या न्यायाधिशांबरोबर शासकीय वकिलांसोबत तसेच वैद्यकिय महाविद्यालयांच्या प्राध्यापकांसोबत, विधी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांबरोबर कायद्याचे महत्व व अंमलबजावणी बाबत चर्चासत्रे देखील घेण्यात आली. तसेच अशासकिय संघटनांमार्फत सापळे रचून डॉक्टरांवर गुन्हे देखील दाखल झाले. या आणि इतर अनेक कार्यक्रमांचा बालिका-बालक प्रमाणावर मात्र कोणताही परिणाम झालेला दिसत नाही.

प्रत्येकालाच आपल्या जिल्ह्यात अथवा तालुक्यात काय परिस्थिती आहे याची जिज्ञासा असणे स्वाभाविक आहे. तसेच आपल्या जिल्ह्यात किंवा तालुक्यात परिस्थिती खूप चांगली आहे असा भ्रम मनात असणेही शक्य आहे. या दोन्ही दृष्टीकोनातून माहिती मिळावी, यासाठी तालुकानिहाय बालिका-बालक प्रमाण तसेच मागील तीन जनगणनांच्या आकडेवारीची तुलना या पुस्तिकेच्या रुपाने संकलित करुन चित्रित केली आहे. राज्यामध्ये बीड जिल्ह्यातील शिरुर कासार तालुक्यात बालिका-बालक प्रमाण सर्वात कमी ७७९ एवढे आढळले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील दोन तालुक्यांमध्ये सुध्दा प्रमाण ८०० पेक्षा कमी आढळून आले आहे. आर्थिक बाबतीत प्रगतीपथावर असणाऱ्या महाराष्ट्र राज्याची ही सामाजिक बाजू मात्र दयनीय दिसते. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या दोन्ही यंत्रणा या माहितीचा उपयोग करुन परिस्थतीमध्ये बदल घडवून आणतील ही आशा आहे.

सर्वसाधारण स्त्री-पुरुष प्रमाणापेक्षा बालिका-बालक प्रमाण हे सद्यस्थितीचे खरेखुरे द्योतक आहे. कारण ते मागील सहा वर्षातील परिस्थिती दर्शविते, तसेच स्थलांतराचा या निर्देशांकावर फारसा परिणाम होत नाही. या उलट स्त्री-पुरुष प्रमाणावर स्थलांतराचा, मृत्यू प्रमाणाचा मोठा प्रभाव आढळतो म्हणून या प्रमाणात दिसणारी वाढ आशादायी ठरु शकत नाही. राज्याच्या आणि देशाच्या दोन्ही निर्देशांकाच्या तुलनात्मक आलेखामध्ये बालिका-बालक प्रमाणाची झपाट्याने होणारी घट प्रकर्षाने जाणवते.

पूर्वीच्या आवृत्ती प्रमाणेच या आवृत्ती मधील आकडेवारी संकलनामध्येही सौ. अश्विनी देवणे-पाडळकर यांची मोलाची मदत झाली. संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष आणि राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्राने विशेषत: कार्यकारी संचालक डॉ. उध्दव गावंडे यांनी दिलेल्या पाठींब्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

**- डॉ. प्रकाश डोके**

प्राध्यापक, जनवैद्यकशास्त्र,
वैद्यकीय अधिक्षक, महात्मा गांधी मिशन,
वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, कामोठे, नवी मुंबई.

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

(१९९१-२००१-२०११)



$$\text{०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण} = \frac{\text{०-६ वर्षे वयातील बालिकांची संख्या}}{\text{०-६ वर्षे वयातील बालकांची संख्या}} \times \text{१०००}$$

## लोकसंख्येतील स्त्री-पुरुष/ बालिका-बालक प्रमाण प्रमाण - भारत १९५१-२०११ (जनगणना)




## लोकसंख्येतील स्त्री-पुरुष/ बालिका-बालक प्रमाण प्रमाण - महाराष्ट्र १९६१-२०११ (जनगणना)



## स्त्री-पुरुष प्रमाण - १९५१-२०११ (जनगणना)




## ०-६ वर्षे वयाचे बालिका-बालक प्रमाण -१९६१-२०११ (जनगणना)



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# भारत

## २००१




## २०११




देशाचे प्रमाण : ९२७

देशाचे प्रमाण : ९१९

### ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# महाराष्ट्र जिल्हा निहाय स्थिती

## १९९१




- राज्याच्या मधल्या भागातील १५ जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण इतर भागाच्या मानाने कमी आहे (९५० पेक्षा कमी)
- राज्याच्या पश्चिमेकडील कोकण किनारपट्टी, नाशिक व नंदुरबार जिल्ह्यात बालिका–बालक प्रमाण चांगले आहे.
- राज्याच्या पूर्वेकडील जिल्ह्यांमध्येसुद्धा बालिका–बालक प्रमाण ९५० हून जास्त आहे.
- गडचिरोली या आदिवासी जिल्ह्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे (९८०)

**राज्याचे प्रमाण : ९४६**

## २००१




- फक्त पाच जिल्ह्यांचे स्त्री–पुरुष प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे
- जळगाव पासून कोल्हापूर पर्यंतच्या मधल्या पट्ट्यातील ९ जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण वेगाने कमी झाले असून ९०० पेक्षा कमी झाले आहे. कोल्हापूर या प्रगत जिल्ह्यात हे प्रमाण सर्वात कमी ८३९ आहे तर इतरत्र ते ८५० ते ९०० च्या दरम्यान आहे.

**राज्याचे प्रमाण : ९१३**

## २०११




- एकूण ३५ पैकी फक्त चार आदिवासी जिल्ह्यांचे प्रमाण ९५० किंवा अधिक आहे.
- गडचिरोली जिल्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९६१ इतके तर बीड जिल्ह्याचे प्रमाण सर्वात कमी ८०७ इतके आहे.
- तसेच १३ जिल्ह्यांचे प्रमाण ९०० ते ९४९ दरम्यान व १४ जिल्ह्यांचे प्रमाण ८५० ते ८९९ दरम्यान आहे.
- २ जिल्ह्यांचे (बीड, जळगाव) प्रमाण ८५० पेक्षा कमी आहे.

**राज्याचे प्रमाण : ८९४**



| बालिका – बालक प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# महाराष्ट्र तालुके

## १९९१



## २००१



## २०११



| राज्याचे प्रमाण : ९४६ | राज्याचे प्रमाण : ९१३ | राज्याचे प्रमाण : ८९४ |
|---|---|---|



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# मुंबई उपनगरे व मुंबई जिल्हा

### १९९१




### २००१




### २०११




- गेल्या दोन दशकामध्ये मुंबई उपनगरे व मुंबई जिल्ह्यातील प्रमाणात अल्पशी घट झाल्याचे चित्र दिसत आहे.
- २०११ मध्ये मुंबईचे प्रमाण ९१४ इतके आढळले आहे.



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# रायगड जिल्हा

## १९९१




- रायगडमधील एकूण तालुक्यांपैकी एकही तालुका ९३५ च्या खाली नाही.
- वस्तुत: फक्त ३ तालुके वगळता इतर १२ तालुक्यातील बालिका–बालक प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

### जिल्ह्याचे प्रमाण : ९६१

## २००१




- या वर्षी सर्व तालुक्यापैकी फक्त ४ तालुक्यातील बालिका–बालक प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- पुणे–मुंबई महामार्गाजवळील व अलिबाग जवळील तालुक्यात हे प्रमाण कमी झालेले दिसते.

### जिल्ह्याचे प्रमाण : ९३९

## २०११




- १९९१ पासून गेल्या दोन दशकात इतर जिल्ह्यांप्रमाणेच ह्या जिल्ह्यातही २६ अंकांची घट झालेली आढळते.
- २००१ च्या तुलनेत सुधागड, खालापूर, महाड, माणगाव, पनवेल व उरण ह्या तालुक्यांच्या प्रमाणात घट झालेली दिसते.
- इतर तालुक्यातील चित्र आशादायी दिसत असले तरी अपेक्षित प्रमाण गाठण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

### जिल्ह्याचे प्रमाण : ९३५





| बालिका – बालक प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# रत्नागिरी जिल्हा

## १९९१




- सर्वच ९ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे व ७ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९६१**

## २००१




- लांजा, गुहागर व संगमेश्वर तालुक्यातील प्रमाण वाढून ते ९५० पेक्षा जास्त झाले असले तरी ९ पैकी ४ तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९५२**

## २०११




- १९९१ च्या तुलनेत २५ अंकांची घट झालेली दिसते.
- २००१ च्या तुलनेत ९ तालुक्यांपैकी फक्त दोन तालुक्यांमध्ये अल्प सुधारणा झाली. उर्वरित तालुक्यांच्या प्रमाणात लक्षणीय घट झालेली दिसते. (लांजा तालुका : ७५ अंकांची घट)

**जिल्हाचे प्रमाण : ९३६**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |

# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# ठाणे जिल्हा

## १९९१




- सर्वच १५ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- शहरी भाग जास्त असलेल्या ६ तालुक्यातील बालिका–बालक प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५२**

## २००१




- दहा वर्षात या ६ तालुक्यात एकाची भर पडून ७ तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे. ठाणे व जवळील परिसरातच हा बदल झाला आहे.
- आदिवासी तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- उल्हासनगरचे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३१**

## २०११




- १९९१ पासून २०११ पर्यंत जिल्ह्याच्या बालिका–बालक प्रमाणात २८ अंकांची घट झालेली आहे. चार तालुके सोडल्यास इतर सर्व तालुक्यांच्या प्रमाणात लक्षणीय घसरण झालेली दिसते.
- २०११ मध्ये तलासरी तालुक्याचे प्रमाण १०१५ झाल्याचे दिसते ही नक्कीच आशादायी बाब आहे.
- शहरी भागात लक्षणीय घट दिसते तर इतर आदिवासी भागात आशादायी चित्र कायम राहिल्याचे लक्षात येते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२४**



| बालिका – बालक प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# अहमदनगर जिल्हा

## १९९१




- सर्वच १४ तालुक्यात हे प्रमाण  ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या उत्तर व दक्षिणेतील मिळून ७ तालुक्यातील बालिका–बालक प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९४९**

## २००१




- दहा वर्षात बालिका–बालक प्रमाणात झपाट्याने घट झालेली दिसून येते व फक्त एका आदिवासी तालुक्यातील बालिका–बालक प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहिलेले दिसून येते.
- उर्वरित १३ तालुक्यात हे प्रमाण ९०० कमी झाले असून ८६० पर्यंत घसरले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ८८४**

## २०११




- दोन दशकांतील आकडेवारी पाहता १९९१ पासून २०११ पर्यंत चिंताजनक अशी ९७ अंकांची घट झाल्याचे दिसते.
- एकूण १४ पैकी ९ तालुक्यांचे प्रमाण ८५० पेक्षा कमी.
- सर्व तालुक्यांचे प्रमाण २०११ मध्ये चिंताजनक झालेले आढळेल.

**जिल्हाचे प्रमाण : ८५२**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# धुळे जिल्हा

### १९९१




- चारही तालुक्यात हे प्रमाण ९०० च्या वर असून साक्री व शिरपूर तालुक्यात ते ९५० पेक्षा जास्त आहे

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४७**

### २००१




- चारही तालुक्यात प्रमाण घटले आहे.
- धुळे तालुक्यात ते ९०० पेक्षाही कमी झाले आहे तर, इतर तीन तालुक्यात ते ९५० पेक्षाही कमी झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९०७**

### २०११




- दोन दशकांत ४९ अंकाची घट
- २००१ च्या तुलनेत फक्त साक्री तालुक्यात १२ अंकांनी प्रगती झाली. सिंदखेडा तालुक्यात २००१ च्या तुलनेत ५० अंकांनी घट झालेली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९८**



| बालिका – बालक प्रमाण | |
|---|---|
| (लाल) | ८०० पेक्षा कमी |
| (नारिंगी) | ८०० ते ८४९ |
| (पिवळा) | ८५० ते ८९९ |
| (फिकट हिरवा) | ९०० ते ९४९ |
| (हिरवा) | ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# जळगाव जिल्हा

### १९९१




- १५ पैकी १४ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पारोळा तालुक्यातील प्रमाण हे राज्यातील सर्वात कमी प्रमाण आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९२५**

### २००१




- सर्वच १५ तालुक्यात बालिका–बालक प्रमाणात लक्षणीय घट झाली असून पुर्वीच्या पारोळा तालुक्याच्या जोडीला इतर ११ तालुक्यांचे प्रमाणही ८६५ ते ९०० च्या दरम्यान झाले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ८८०**

### २०११




- जिल्ह्यात २० वर्षात ८३ अंकांची घट झाली.
- सर्व तालुक्यातील प्रमाणात लक्षणीय घट झालेली आढळते.
- एरंडोल, धरणगाव, पारोळ व जामनेर तालुक्यातील प्रमाणात ५० पेक्षा जास्त अंकांनी घट झालेली आढळते.

**जिल्हाचे प्रमाण : ८४२**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# नाशिक जिल्हा

## १९९१




- सर्वच १५ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९५० पेक्षा जास्त प्रमाण असणारे १० तालुके आहेत तर ५ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९५४**

## २००१




- ९५० पेक्षा कमी प्रमाण असणाऱ्या तालुक्यांच्या संख्येत ५ वरून १० पर्यंत वाढ झाली आहे.
- जिल्ह्यातील सर्वात कमी प्रमाण नाशिक व निफाड तालुक्यात ८८८ एवढे झाले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९२०**

## २०११




- गेल्या दोन दशकांची आकडेवारी पाहता बालिका–बालक प्रमाणात ६४ अंकांची घसरण झालेली आढळते.
- २००१ च्या तुलनेत पेठ वगळता सर्व तालुक्यांच्या प्रमाणात लक्षणीय घसरण झालेली आढळते.
- एकूण जिल्ह्याच्या आकडेवारीतही ३० अंकांची घट दिसते.
- चांदवड तालुक्यात जिल्ह्यातील सर्वात जास्त घट (७१ अंकांची) झालेली आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ८९०**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# नंदूरबार जिल्हा

## १९९१




- सर्वच ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे. हे सर्व आदिवासी तालुके आहेत.
- अक्कलकुवा व आक्रणी या २ तालुक्यात प्रमाण १००० पेक्षा जास्त आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९७७**

## २००१




- सन १९९१ साली सर्वच तालुक्यातील बालिकांचे प्रमाण ९५० ते १०३२ च्या टप्प्यात होते ते २००१ साली फक्त ४ तालुक्यामध्ये (आक्राणी, नवापूर, तळोदा व अक्कलकुवा) ९५० ते ९९५ टप्प्यात आले आहे.
- सन १९९१ साली सर्वच तालुक्यामध्ये हे प्रमाण ९५० च्या वर होते. २००१ साली शहादा आणि नंदुरबार तालुक्यात हे प्रमाण ९५० च्या खाली घसरले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९६१**

## २०११




- जिल्ह्यात दोन दशकात ३३ अंकांची घट. सर्व तालुक्यातील प्रमाण ९०० पेक्षा जास्त असले तरी सर्वच तालुक्यात घट झाली आहे.
- २००१च्या तुलनेत चार ऐवजी तीन तालुक्यात प्रमाण ९५० पेक्षा अधिक आहे.
- या आदिवासी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ६ वर्षाखालील बालिका–बालक प्रमाणात २००१ च्या तुलनेत घट झालेली दिसून येते.
- अक्कलकुवा तालुक्यात ३९ अंकांनी घट झालेली आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९४४**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |

# ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# पुणे जिल्हा

## १९९१




- सर्वच १४ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पश्चिमेकडील ४ तालुके व पुरंदर मध्ये हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

## २००१




- पुणे जिल्ह्याच्या पूर्व भागातील ६ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा (अपवाद पुणे शहर-९०९) कमी झाले आहे.
- पश्चिम भागातील ७ तालुक्यात ते ९०० ते ९५० दरम्यान आहे. स्पष्टपणे जिल्ह्याचे दोन भाग पडल्यासारखे दिसत आहेत

## २०११




- १९९१ पासून ६० अंकांची चिंताजनक घट २०११ मध्ये पहावयास मिळते. सव१४ तालुक्यांच्या प्रमाणात लक्षणीय घट झाल्याचे दिसते.
- २००१ मध्ये सात तालुक्यांचे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान होते. तर २०११ मध्ये फक्त तीन तालुके ह्या प्रमाणात मोडत आहेत. शिरुर तालुक्यात तर प्रमाण ८४५ झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४३**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९०२**

**जिल्ह्याचे प्रमाण : ८८३**



| बालिका - बालक प्रमाण | |
|---|---|
| लाल | ८०० पेक्षा कमी |
| नारंगी | ८०० ते ८४९ |
| पिवळा | ८५० ते ८९९ |
| फिकट हिरवा | ९०० ते ९४९ |
| हिरवा | ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# सोलापूर जिल्हा

### १९९१




- सर्वच ११ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- दक्षिण सोलापूर तालुक्यात बालिका–बालक प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३५**

### २००१




- फक्त तीनच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९०० पेक्षा कमी प्रमाण असलेल्या उर्वरित ८ पैकी बार्शी तालुक्यात हे प्रमाण ८४५ पर्यंत घसरले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९५**

### २०११




- इतर जिल्ह्याप्रमाणेच गेल्या दोन दशकातील प्रमाण पहाता ५२ अंकांची तीव्र घसरण झाल्याचे दिसते.
- २००१ मध्ये ७ तालुक्यांचे प्रमाण ८५०–९०० च्या दरम्यान होते तर २०११ मध्ये ५ तालुक्यांचे प्रमाण ८५०–९०० च्या श्रेणीत गेले असून करमाळा,माढा व बार्शी ह्या तालुक्यांचे प्रमाण ८०० ते ८५० च्या दरम्यान गेले आहे.
- सर्व ११ तालुक्यांच्या प्रमाणात चिंताजनक घट झालेली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८८३**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# सातारा जिल्हा

## १९९१




- सातारा जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी, ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे. तर महाबळेश्वर मध्ये हे प्रमाण ८८० आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४१**

## २००१




- महाबळेश्वर तालुक्यातील प्रमाणात ९३१ पर्यंत वाढ झाली असली तरी ११ पैकी ६ तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० मध्ये आले आहे.
- विकसित कराड तालुक्यात हे प्रमाण चिंताजनक पातळीपर्यंत (८४८ पर्यंत) घसरले आहे.

**महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त वाढ झालेला तालुका महाबळेश्वर – ५१ अंक**

**जिल्ह्याचे प्रमाण : ८७८**

## २०११




- जिल्ह्यामध्ये १० वर्षात १७ अंकांची वाढ.
- गेल्या वीस वर्षात साताऱ्याच्या बालिका–बालक प्रमाणात ४६ अंकांची चिंताजनक घट झालेली आढळते.
- २००१ च्या तुलनेत वाई, पाटण, कोरेगाव व सातारा या तालुक्यांच्या प्रमाणात आशादायी वाढ झालेली दिसते. फलटण व माण तालुक्यात मात्र लक्षणीय घट झालेली आहे.
- गेल्या १० वर्षात ९०० ते ९५० दरम्यान प्रमाण असणाऱ्या तालुक्यांची संख्या ४ वरुन ५ झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९५**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# कोल्हापूर जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पैकी ५ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३१**

## २००१




- पश्चिम महाराष्ट्रातील प्रगत अशा कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील प्रमाणात चिंताजनक घट झालेली आहे.
- राज्यात १९९१ च्या तुलनेत १०० अंकाहून जास्त घट असलेले ९ तालुके आहेत. त्यातील सर्वात जास्त म्हणजे ४ तालुके (पन्हाळा, कागल, राधानगरी व करवीर) या जिल्ह्यातील आहेत.

**राज्यात सर्वात कमी प्रमाण तालुका–पन्हाळा–७९५**
**राज्यात सर्वात जास्त घट झालेला तालुका पन्हाळा – १३६ अंक**

**जिल्ह्याचे प्रमाण : ८३९**

## २०११




- जिल्ह्यामध्ये १० वर्षात २४ अंकांची वाढ.
- १९९१ ते २०११ च्या दोन दशकांत जिल्ह्यांच्या प्रमाणात ६८ अंकांची चिंताजनक घट झाल्याचे दिसते.
- २००१ च्या तुलनेत राधानगरी, भुदरगड व गडहिंग्लज ह्या तालुक्यांच्या बालिका–बालक प्रमाणात लक्षणीय घट झाल्याचे दिसत आहे.
- इतर ९ तालुक्यांमधील प्रमाण २००१ च्या तुलनेत वाढले.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८६३**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# सांगली जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९ तालुक्यांपैकी आटपाडी या एकाच तालुक्यातील बालिका–बालक प्रमाण ९५० पेक्षा जास्त तर इतर ८ तालुक्यात ते ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२४**

## २००१




- ९ पैकी ८ तालुक्यात हे प्रमाण ८०० ते ९०० या दरम्यान आले आहे.
- वाळवा तालुक्यात हे प्रमाण ८०६ पर्यंत घसरले आहे.
- साखर उत्पादक विभागात हे प्रमाण भयावह रीतीने कमी झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८५१**

## २०११




- जिल्ह्यामध्ये १० वर्षात १६ अंकांची वाढ.
- गेल्या वीस वर्षात ५७ अंकांची चिंताजनक घट झाल्याचे दिसत आहे. कवठे महाकाळ व शिराळा ह्या दोन तालुक्यांच्या प्रमाात २००१ च्या तुलनेत घट झाल्याचे दिसते.
- इतर सर्व तालुक्यांत अल्पशी वाढ झाल्याने ह्या जिल्ह्याचे चित्र आशादायी दिसत आहे. २०११ च्या जनगणनेत केडगाव हा देखील तालुका सांगली जिल्ह्यात दाखल झाला आहे व त्याचे प्रमाण ८६२ इतके चिंताजनक आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८६७**



| बालिका – बालक प्रमाण | |
|---|---|
| (लाल) | ८०० पेक्षा कमी |
| (नारिंगी) | ८०० ते ८४९ |
| (पिवळा) | ८५० ते ८९९ |
| (फिकट हिरवा) | ९०० ते ९४९ |
| (हिरवा) | ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# सिंधुदुर्ग जिल्हा

### १९९१




- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- वैभववाडी तालुक्यात हे प्रमाण १०३० इतके आहे.
- मध्य भागातील ५ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त असून दक्षिणेकडील २ तालुक्यांत ते ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६३**

### २००१




- वेंगुर्ला तालुक्यातील प्रमाण ९३४ वरून ९८४ पर्यंत वाढले आहे.
- इतरपैकी ५ तालुक्यात ते ९०० ते ९५० च्या दरम्यान असून उत्तर भागातील दोनच तालुक्यात ते ९५० पेक्षा जास्त आहे.

**हेच खरे वैभव !**
**राज्यात सर्वात जास्त प्रमाण तालुका वैभववाडी – १०१५**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४४**

### २०११




- १९९१ ते २०११ ह्या दोन दशकांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या प्रमाणात तीव्र घट (४१ अंकांची) झाल्याचे दिसत आहे.
- गेल्या दशकभरात एकूण ८ तालुक्यांपैकी जवळ जवळ सर्वच तालुक्यांच्या लिंगगुणोत्तर प्रमाणात घट झाल्याचे दिसते.
- ही परिस्थिती पाहता सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बालिका–बालक प्रमाणाची परिस्थिती चिंताजनक असल्याचे स्पष्ट होते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२२**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# औरंगाबाद जिल्हा

### १९९१




- औरंगाबाद मधल्या पट्ट्यातील ५ तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे. तर औरंगाबाद तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे

### २००१




- पैठण व सिल्लोड तालुके वगळता इतर तालुक्यात हे प्रमाण कमी होऊन ८५० ते ९०० या टप्प्यात गेले आहे.

### २०११




- १९९१ पासून २०११ पर्यंत ७५ अंकांची घट औरंगाबाद जिल्ह्यात झालेली दिसते. सर्वच नऊ तालुक्यांमध्ये बालिका–बालक प्रमाण चिंताजनक झाले आहे.
- २००१ च्या तुलनेत सर्व तालुक्यांची परिस्थिती खालावलेली आहे. २००१ मध्ये दोन तालुक्यांचे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान होते. तर २०११ मध्ये सर्वच तालुक्याचे प्रमाण पिवळ्या म्हणजेच ८००–८५० च्या श्रेणीमध्ये आले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३३** | **जिल्ह्याचे प्रमाण : ८९०** | **जिल्ह्याचे प्रमाण : ८५८**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# जालना जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ८ पैकी ४ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त प्रमाण आहे व ४ तालुक्यात ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९५१**

## २००१




- जिल्ह्याच्या पश्चिमेकडील ४ तालुक्यांत हे प्रमाण कमी होऊन ८५०–९०० या दरम्यान आहे. तर पुर्वेकडील चार जिल्ह्यांत ९०० पेक्षा जास्त आहे. परंतू ९५० पेक्षा कमी आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९०३**

## २०११




- गेल्या दोन दशकातील परिस्थिती पाहता जिल्ह्याच्या आकडेवारीत ८१ अंकांची लक्षणीय घट झाली आहे. आठही तालुक्यांचे प्रमाण २००१ च्या तुलनेत घटलेले आहे.
- २००१ मध्ये ४ तालक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा कमी होते. परंतु २०११ ची आकडेवारी पाहता सर्व तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे.
- जाफराबाद तालुक्याचे प्रमाण ८५० पेक्षाही कमी झाले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ८७०**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# परभणी जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९ तालुक्यांपैकी ५ तालुक्यात ते ९०० ते ९५० च्या दरम्यान प्रमाण आहे. इतरत्र ते ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५६**

## २००१




- सोनपेठ वगळता इतर सर्व तालुक्यात या प्रमाणात घट होऊन सर्वांचे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान झाले आहे.
- सोनपेठ तालुक्यात या प्रमाणात वाढ झालेली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२३**

## २०११




- वीस वर्षात ७२ अंकांची घट सर्व तालुक्याच्या प्रमाणात घट झालेली आढळते.
- गेल्या १० वर्षात सोनपेठ तालुक्याच्या प्रमाणात ११३ अंकांनी घट झाली असून सेलू तालुक्याच्या प्रमाणात ६८ अंकांची घट झालेली आढळते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८८४**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# हिंगोली जिल्हा

### १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९५० ते १००० च्या दरम्यान आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९५३**

### २००१




- कळमनूरी तालुका वगळता इतर (३) तालुक्यांत हे प्रमाण कमी झाले असून ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे तर सेनगांव मध्ये हे प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९२७**

### २०११




- १९९१ मध्ये सर्व तालुक्यांचे प्रमाण ९५० पेक्षा जास्त होते.
- दोन दशकांत जिल्ह्याच्या प्रमाणात ७१ अंकांची घट.
- २००१ मध्ये फक्त सेनगाव ह्या तालुक्याचेच प्रमाण ९०० पेक्षा कमी होते. परंतु २०११ मध्ये परिस्थिती आणखीन खालावून सर्वच तालुक्यांचे प्रमाण ९०० च्या खाली गेले.

**जिल्हाचे प्रमाण : ८८२**



| बालिका – बालक प्रमाण | |
|---|---|
| लाल | ८०० पेक्षा कमी |
| नारिंगी | ८०० ते ८४९ |
| पिवळा | ८५० ते ८९९ |
| फिकट हिरवा | ९०० ते ९४९ |
| हिरवा | ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# बीड जिल्हा

## १९९१




- सर्वच ११ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या ७ तालुक्यांमध्ये हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान असून उर्वरित ४ तालुक्यांत ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३९**

## २००१




- दक्षिणेकडील ६ तालुक्यांत बालिका–बालक प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे. इतर तालुक्यांत ते ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९४**

## २०११




- महाराष्ट्रातील सर्वात भयावह परिस्थिती या जिल्ह्यात दिसते. दोन दशकात १३२ अंकांची तीव्र घट. महाराष्ट्रातील सर्वात जास्त घट आढळलेला जिल्हा.
- वडवणी, गेवराई, माजलगाव ह्या तीनही तालुक्यांच्या प्रमाणात अनुक्रमे ११३, १११, १०३ अंकांची तीव्र घट झालेली दिसते.
- फक्त एकाच तालुक्याचे (आंबेजोगाई) प्रमाण ८५० च्या वर आहे.
- **शिरुर–कासार तालुक्याचे प्रमाण ७७९ असून राज्यात ते सर्वात कमी आहे.**

**जिल्ह्याचे प्रमाण : ८०७**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# नांदेड जिल्हा

### १९९१




- सर्वच १६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- भोकर, माहूर व बिलोली या तालुक्यांत हे प्रमाण ९५० पेक्षा कमी असून इतर सर्व तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६०**

### २००१




- हे चित्र एकदम उलट झाले असून फक्त किनवट व धर्माबाद तालुक्यांत हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे व इतर १४ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२९**

### २०११




- दोन दशकात ५० अंकांची घट
- १६ पैकी ४ तालुक्यांच्या प्रमाणात वाढ झाली असून, माहूर तालुक्याने ९५० चा टप्पा पार केला आहे. तेथे २३ अंकांची वाढ झालेली आहे.
- अर्धापूर, कंधार व नांदेड वगळता सर्वच तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९१०**



| बालिका – बालक प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# लातूर जिल्हा

## १९९१




- सर्वच १० तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या पुर्वेकडील ४ तालुक्यात व रेणापूर तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त असून इतर ५ तालुक्यात ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४७**

## २००१




- मुख्यालयाच्या लातूर तालुक्यात हे प्रमाण कमी झाले असून ९०० पेक्षा कमी आहे.
- इतर सर्व तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९१८**

## २०११




- १९९१ च्या तुलनेत (जिल्ह्याच्या प्रमाणातही) ५८ अंकांची घट २०११ मध्ये नोंदविलेली आहे.
- २००१ च्या तुलनेत सर्व १० तालुक्याच्या प्रमाणात चिंताजनक घट झाल्याचे दिसत.
- रेणापूर तालुक्यामध्ये ८८ अंकांची तीव्र घट झाल्याचे दिसते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८८९**



| बालिका – बालक प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# उस्मानाबाद जिल्हा

### १९९१




- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या भूम, लोहारा, उस्मानाबाद व उमरगा तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे. इतर तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४७**

### २००१




- उत्तरेकडील ५ तालुक्यांमध्ये या प्रमाणात बरीच घट झाली असून प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे. तर उमरगा, लोहारा व तुळजापूर तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८९४**

### २०११




- २० वर्षांमध्ये ८० अंकांची घट.
- उमरगा तालुका वगळता उर्वरीत ७ ही तालुक्यात बालिकांच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे.
- ८ पैकी ४ तालुक्यात हे प्रमाण ८०० ते ८५० च्या दरम्यान आहे.
- लोहारा, उस्मानाबाद आणि तुळजापूर या तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० या टप्प्यात आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८६७**



| बालिका - बालक प्रमाण | |
|---|---|
| (लाल) | ८०० पेक्षा कमी |
| (नारिंगी) | ८०० ते ८४९ |
| (पिवळा) | ८५० ते ८९९ |
| (फिकट हिरवा) | ९०० ते ९४९ |
| (हिरवा) | ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# अकोला जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९००ते ९५० च्या दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२९**

## २००१




- पातूर तालुक्यात हे प्रमाण ९२७ वरून ९५७ पर्यंत वाढले आहे.
- इतर तालुक्यात दोन्ही जनगणनेमध्ये विशेष फरक पडलेला नाही.

एकमेव जिल्हा
बालिका–बालक प्रमाणात १९९१ च्या तुलनेत वाढ.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३३**

## २०११




- वीस वर्षात १७ अंकांची घट
- सन २००१ मध्ये बालिका–बालक प्रमाण ९५० ते १००० या टप्प्यात असलेल्या एकमेव पातूर तालुक्यामध्ये २०११ साली घट होऊन तो ९०० च्या खाली सरकला आहे.
- केवळ बाळापूर तालुक्यात ३ अंकांची सुधारणा.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९१२**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# अमरावती जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या पूर्व भागातील तिवसा तालुका व पश्चिमेकडील सात तालूक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण :९५०**

## २००१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ९५० पेक्षा जास्त प्रमाण असणारे तीनच तालुके असून उर्वरित ११ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.

**दोन्ही जनगणनेत प्रमाण स्थिर असलेला तालुका – चिखलदरा ९६८**

**जिल्ह्याचे प्रमाण :९४१**

## २०११




- दोन दशकांमध्ये १५ अंकांची घट
- ९५० पेक्षा जास्त प्रमाण असणारे ५ तालुके आहेत.
- आलपूर तालुक्यातील प्रमाणात १४ अंकांनी वाढ.
- धामणगावाच्या प्रमाणात २४ अंकांनी घट झालेली दिसून येते.
- ६ तालुक्यात वाढ झालेली दिसून येते.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३५**



| बालिका – बालक प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# बुलढाणा जिल्हा

### १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या उत्तर बाजूकडील २ व मध्य भागातील २ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४५**

### २००१




- जिल्ह्याच्या उत्तरेकडील एकाच तालुक्यात हे प्रमाण ९५० असून दक्षिणेकडील ३ तालुक्यात हे प्रमाण ८५० ते ९०० दरम्यान घसरले आहे. इतरत्र हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९०८**

### २०११




- दोन दशकात ९० अंकांची घट. संग्रामपूर वगळता सर्वच तालुक्यातील प्रमाणात घट झालेली दिसून येते.
- १३ पैकी २ तालुक्यांचे प्रमाण ९०० च्या वर आहे.
- देऊळगाव राजा, सिंदखेड राजा तालुक्यातील प्रमाण ८०० पेक्षा कमी झाले.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८५५**



| बालिका – बालक प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# यवतमाळ जिल्हा

### १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- जिल्ह्याच्या पूर्वेकडील व पश्चिमेकडील जिल्ह्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- मध्यभागातील तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० दरम्यान आहे.

### २००१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- महागांव व घाटंजी तालुक्यात ह्या प्रमाणात वाढ झाली आहे.

### २०११




- दोन दशकात जिल्ह्याच्या प्रमाणात ३९ अंकांची घट. केळापूर तालुक्याच्या प्रमाणात ८७ इतकी लक्षणीय घट झाली.
- घाटंजीत ५७ अंकांची लक्षणीय घट झाली असून प्रमाण ९०० पेक्षा कमी झाले आहे. इतर सर्व तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक आहे.
- मारेगाव व बाभुळगाव तालुक्यातील प्रमाणात २७ अंकांनी वाढ झाली. चार तालुक्यात प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६१**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३३**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२२**



| बालिका - बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# वाशिम जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- मंगरूळपीर या एकाच तालूक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४१**

## २००१




- कारंजा या एकाच तालुक्यात हे प्रमाण ९२६ वरून ९५२ वर गेले आहे.
- उर्वरित ५ तालुक्यात घट झाली असून २ तालुक्यात तर ते ९०० पेक्षा कमी झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९१८**

## २०११




- जिल्ह्यात २० वर्षात ७८ अंकांची घट झाली. सर्वच ६ तालुक्यामध्ये २००१ च्या तुलनेत प्रमाण कमी झाले असून २००१ च्या तुलनेत ५५ अंकांनी घट झालेली आहे.
- केवळ कारंजा तालुक्यातील प्रमाण ९०० पेक्षा जास्त असून रिसोड तालुक्यातील बालिका–बालक प्रमाण सर्वात कमी (८२६) झालेले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ८६३**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# भंडारा जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- तालुका लाखनी वगळता इतर ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६४**

## २००१




- सर्वच तालुक्यात बालिका–बालक प्रमाणात थोडी घट झाली असली तरी जिल्ह्याचे चित्र बरेचसे पुर्वी प्रमाणेच असून ६ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- लाखनी तालुक्यात बालिका–बालक प्रमाणात २८ ने वाढ झाली असून साकोली मध्ये ३२ ने घट झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५६**

## २०११




- जिल्ह्यात २० वर्षात १४ अंकांची घट झाली आहे.
- सर्व तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक असून लाखनी, पवनी व लाखांदूर या तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- पवनी तालुक्यातील प्रमाण हे १३ अंकांनी घसरलेले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५०**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# चंद्रपूर जिल्हा

### १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- नागभीड, चंद्रपूर व वरोरा हे तालुके वगळता इतर अकरा तालूक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९६५**

### २००१




- दक्षिणेकडील ३ तालुके, कोरपना, बल्लारपूर, पोंभूर्णा व चंद्रपूर तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा कमी आहे.
- मुख्यालयाच्या तालुक्यात ह्या प्रमाणात ९४८ वरून ८९९ पर्यंत तीव्र घट झाली आहे.
- नागभीड व सिंदेवाही या तालुक्यात ह्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३९**

### २०११




- जिल्ह्यामध्ये १० वर्षात १४ अंकांची वाढ.
- दोन दशकात १२ अंकांची घट.
- सर्वच तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- पोंभूर्णा तालुक्यात ७७ अंकांची वाढ होऊन प्रमाण १०१६ पर्यंत पोहचले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५३**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# गडचिरोली जिल्हा

### १९९१




- हा पूर्ण आदिवासी जिल्हा आहे.
- १० तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे. कोरची व अहेरी तालुक्यात हे प्रमाण अनुक्रमे १०८१ व १००१ आहे.

**राज्यात सर्वात जास्त प्रमाण**
**तालुका कोरची-१०८१**

**जिल्हाचे प्रमाण : ९८०**

### २००१




- कोरची तालुक्यातील प्रमाणात १२८ अंकांनी घट झाली आहे.
- देसाईगंज वगळता सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहीले आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९६६**

### २०११




- २० वर्षात १९ अंकांची घट.
- कोरची तालुक्यांचे प्रमाण १०१३ झाले आहे. ही वाढ ६० अंकांची असून लक्षणीय आहे.
- सर्वच तालुक्याचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक असून १२ पैकी ९ तालुक्यांचे प्रमाण ९५० पेक्षा अधिक आहे.
- मुलचेरा तालुक्यातील प्रमाणात ४७ अंकांनी घट झाली आहे.

**जिल्हाचे प्रमाण : ९६१**



| बालिका - बालक प्रमाण |
| --- |
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



# ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण

# नागपूर जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे. एकूण १४ पैकी ९ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५१**

## २००१




- १९९१ पेक्षा उलट प्रकारचे चित्र दिसत असून ५ तालुक्यांत हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त राहीले आहे. तर ९ तालुक्यांत हे प्रमाण ९३० ते ९५० दरम्यान आहे.
- नागपूर या एकाच जिल्ह्यामध्ये नरखेड, काटोल, रामटेक, कुही, नागपूर ग्रामीण व भिवापूर या ६ तालुक्यांतील प्रमाणात वाढ झालेली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९४२**

## २०११




- २० वर्षात २० अंकांची घट. केवळ ३ तालुक्यांच्या प्रमाणात वाढ झालेली असून उर्वरित सर्व तालुक्यात लक्षणीय घट झालेली आढळून येते.
- रामटेक तालुक्यात ५६ अंकांची घसरण झालेली असून ती ९९७ वरुन ९४१ इतक्यावर आलेली आहे.
- सर्व तालुक्यांचे प्रमाण ९०० पेक्षा अधिक आहे. भिवापूर व नागपूर ग्रामीणचे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९३१**



| बालिका - बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |





# ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# वर्धा जिल्हा

## १९९१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० पेक्षा जास्त आहे.
- ५ तालुक्यात ९५० पेक्षा जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५२**

## २००१




- सर्वच तालुक्यात हे प्रमाण ९०० ते ९५० या दरम्यान आहे.
- समुद्रपूर तालुक्याच्या प्रमाणात ५५ ने घट झाली असून ९६४ वरून ते २००१ मध्ये ९०९ झाले आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९२८**

## २०११




- दोन दशकात ३३ अंकांची घट. केवळ एक तालुक्यातील प्रमाण ९५० पेक्षा अधिक आहे. इतर सर्व तालुक्यांतील प्रमाण ९०० ते ९५० या दरम्यान आहे.
- कारंजा तालुक्याच्या प्रमाणात २१ अंकाने वाढ झाली आहे.
- ८ तालुक्यांपैकी २ तालुक्यांच्या प्रमाणात वाढ झाली असून उर्वरित ६ तालुक्यांच्या प्रमाणात घट झाली आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९१९**

| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |

## ०–६ वर्षे वयाच्या बालिका–बालकांचे प्रमाण

# गोंदिया जिल्हा

## १९९१




- सर्वच ८ तालुक्यात हे प्रमाण ९५० पेक्षा जास्त आहे.
- गोरेगाव व देवरी तालुक्यात हे प्रमाण १००० हून जास्त आहे.

**जिल्ह्याचे प्रमाण : ९७८**

## २००१




- अर्जुनी मोरगाव वगळता इतर तालुक्यात बालिका–बालक प्रमाणात थोडी घट झालेली असली तरी हे प्रमाण ६ तालुक्यांत ९५० पेक्षा जास्त आहे.
- गोरेगाव व तिरोडा या बिगर आदिवासी तालुक्यात तीव्र घट झाली.

**गडचिरोली, नंदुरबार, यवतमाळ, गोंदिया व ठाणे या आदिवासी जिल्ह्यांमधील प्रत्येकी दोन तालुके १९९१ मध्ये बालिका–बालक प्रमाण १००० पेक्षा जास्त असलेले होते परंतू २००१ मध्ये यापैकी एकाही तालुक्यात हे प्रमाण १००० वर राहिलेले नाही.**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५८**

## २०११




- वीस वर्षात २२ अंकांची घट. सन २०११ मध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण कमी अधिक फरकाने २००१ इतकेच राहिले आहे.
- २०११ साली गोंदिया, आमगाव, सालेकसा, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव या आदिवासी तालुक्यांमध्ये ६ वर्षाखालील बालिकांचे प्रमाण २००१ च्या तुलनेत कमी झालेले आहे.
- गोरेगाव, तिरोडा, देवरी तालुक्यात वाढ झाली आहे.

**२०११ मध्ये देखील एकाही तालुक्यात हे प्रमाण १००० वर राहिलेले नाही.**

**जिल्ह्याचे प्रमाण : ९५६**



| बालिका – बालक प्रमाण |
|---|
| ८०० पेक्षा कमी |
| ८०० ते ८४९ |
| ८५० ते ८९९ |
| ९०० ते ९४९ |
| ९५० व त्यापेक्षा अधिक |



## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण २००१ व २०११ मधील फरक




| बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण २००१ व २०११ मधील फरक | |
|---|---|
| लाल | १०० व त्यापेक्षा अधिक घट |
| नारिंगी | ७५ ते ९९ घट |
| पिवळा | ५० ते ७४ घट |
| निळा | ३० ते ४९ घट |
| फिकट निळा | १ ते २९ घट |
| पांढरा | प्रमाण स्थिर |
| हिरवा | प्रमाणात वाढ |

## ०-६ वर्षे वयाच्या बालिका-बालकांच्या प्रमाणातील (२००१-२०११) फरकानुसार तालुक्यांचे विभाजन




| | | |
|---|---|---|
| लाल | प्रमाण घटले (१०० व जास्त अंकांनी) | तालुके ५ |
| नारिंगी | प्रमाण घटले (७५ ते ९९ अंकांनी) | तालुके १० |
| पिवळा | प्रमाण घटले (५० ते ७४ अंकांनी) | तालुके ३२ |
| निळा | प्रमाण घटले (३० ते ४९ अंकांनी) | तालुके ६५ |
| फिकट निळा | प्रमाण घटले (१ ते २९ अंकांनी) | तालुके १३९ |
| पांढरा | प्रमाण स्थिर राहिले | तालुके ६ |
| हिरवा | प्रमाण वाढले | तालुके ९५ |

* नवीन झालेल्या तालुक्यांची तुलना सामाविष्ट केलेली नाही

# मुलगा मुलगी एक समान

**महाराष्ट्राचे २०११ च्या जनगणनेतील (०-६) वर्षे वयाच्या बालिका-बालकांचे प्रमाण ८८३ आहे.**

| | राज्य | २०११ च्या जनगणनेतील (०-६ वर्षे) बालिका-बालक प्रमाण |
|---|---|---|
| महाराष्ट्रापेक्षा जास्त प्रमाण असणारी राज्ये | छत्तीसगड | ९६९ |
| | केरळ | ९६४ |
| | आसाम | ९६२ |
| | प. बंगाल | ९५६ |
| | तामिळनाडू | ९४३ |
| महाराष्ट्रापेक्षा कमी प्रमाण असणारी राज्ये | हरियाना | ८३४ |
| | पंजाब | ८४६ |
| | जम्मू - काश्मिर | ८६२ |
| भारत | | ९१९ |

* प्रमुख राज्यांची तुलना

**ऋणनिर्देश**

जनगणना कार्यालय

संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष

संचालक, आरोग्य सेवा
महाराष्ट्र राज्य, मुंबई



**मुलगी झाली म्हणून बाळगू नका भिती, मुलगी ही देखील देशाची संपत्ती.**

मुलगी वाचवा!

# गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व तपासणी विषयक महत्वाच्या घटना

१९७८ – शासकीय रुग्णालयांत गर्भजल तपासणीच्या दुरुपयोगावर बंदी आणण्याबाबत केंद्र शासनाने सूचना दिल्या.

१९८८ – सामाजिक न्यायासाठी झगडणाऱ्या संघटनांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात गर्भलिंग निदानावर प्रतिबंध आणण्यासाठी महाराष्ट्र प्रसूतिपूर्व गर्भलिंग निदान तंत्र नियंत्रण कायदा अस्तित्वात आला.

१९९४ – देशातील सर्व स्तरावर अंतिमत: देशात प्रसवपूर्व निदान तंत्र नियंत्रण कायदा अस्तित्वात आला.

२००३ – १९९४ च्या कायद्यात दुरुस्ती करुन गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा अस्तित्वात आला.

२०१३ – मार्च २०१३ पर्यंत ४३२ तक्रारी दाखल. एकुण ११८ निकाल जाहिर, त्यापैकी ४८ डॉक्टर दोषी.

समुचित प्राधिकरणाद्वारे ६० डॉक्टरांची नावे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला कळविण्यात आली. इतर १५ डॉक्टरांची नावे संबंधित परिषदेकडे कळविण्यात आली आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून एका डॉक्टरचे नाव ५ वर्षांसाठी कमी केले आहे. तसेच २८ जणांची नोंदणी निलंबित केली आहे. इतर १२ जणांना समज देण्यात आली आहे.

छकुल्या ...मुकलेल्या!

## कायद्याचा उद्देश व निवडक तरतुदी

- राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाचा (२००२) मुख्य उद्देश लोकसंख्या नियंत्रण आहे. यामागे सर्वांगीण विकास करुन स्त्री-पुरुष प्रमाण समतोल करणे हा देखील एक उद्देश आहे.
- प्रसवपूर्व निदान तंत्र (विनियमन आणि दुरुपयोग प्रतिबंध) कायदा १९९४ मध्ये आस्तित्वात आला. सन २००२ मध्ये कायद्याच्या नावात बदल होवून गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा असे नाव देण्यात आले आहे. हा कायदा नवीन स्वरुपात १४ फेब्रुवारी २००३ पासून अस्तित्वात आला.
- या कायद्यानुसार गर्भधारणेपूर्वी किंवा गर्भधारणेनंतर लिंग निवडीस प्रतिबंध आहे. जनुकीय विकृती व गर्भातील इतर गुणसूत्र संबंधित दोष यांचे निदान करण्यासाठी अल्ट्रासाऊंड व तत्सम तंत्राचा वापर करण्यास या कायद्यात परवानगी असली तरी या कायद्यान्वये गर्भलिंग निदान तंत्रावर नियंत्रण आहे.
- गर्भलिंग निदान तंत्राचा दुरुपयोग होवून, गर्भलिंग निदान करुन मुलीचा गर्भ असल्यास तो नाहीसा केला जातो. या प्रकाराला आळा बसावा व त्याद्वारे समाजातील स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोल दूर व्हावा हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.
- लिंग निवड करणाऱ्यास रुपये १०,०००/- दंड व ३ वर्षे कारावासाच्या शिक्षेची तरतूद या कायद्यात आहे. पुनरावृत्ती झाल्यास रु. ५०,०००/- पर्यंत दंड व ५ वर्षे कारावास अशी शिक्षा होवू शकते. लिंग निदानात वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग आढळल्यास राज्य वैद्यकीय कौन्सिल संबंधित डॉक्टरांची नोंदणी स्थगित करु शकते आणि डॉक्टरास शिक्षा झाल्यास डॉक्टरांची नोंदणी कौन्सिल रद्द करु शकते.
- कोणतीही नोंद न झालेली मशीन जप्तीस पात्र असून मशीन धारकास कायद्यांतर्गत शिक्षा होऊ शकते.
- नोंदणीकृत जागा सोडून मशिन इतरत्र वापरास बंदी आहे.
- कोणत्याही सोनोग्राफी तज्ज्ञास दोन पेक्षा जास्त केंद्रांसाठी कार्यरत राहता येणार नाही.
- नोंदणी शुल्क एका केंद्रातील एका सुविधेसाठी २५,००० तर एकापेक्षा जास्त सुविधेसाठी ३५,००० इतके असेल.
- समुचित प्राधिकरणास ३० दिवस अगोदर मशीन बाबतीतील सुधारणांकरीता कळविणे बंधनकारक आहे.

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.

Ramas Design Studio, Pune